# October- 2023

3/10/23



कुंडल : इस्लामपूर येथे झालेल्या विभागीय कबड्डी स्पर्धेत पारितोषिक मिळालेला क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाचा संघ.

## क्रांतिअग्रणी महाविद्यालयाचा संघ आंतरविभागीय कबड्डीसाठी पात्र

कुंडल, ता. २ : क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या महिला कबड्डी संघाची आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली.

इस्लामपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) अंतर्गत सांगली विभागीय कबड्डी (महिला) स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. १३ व १४ ऑक्टोबरला कोल्हापूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संघातील वृषाली कुंभार (संघनायक), गायत्री लोहार, ऋतुजा माळी, प्रगती पाटील, ऋतुजा लाड, सानिका माळी, आरती परबत, श्रुतिका मोकरे, पायल जाधव, सुहानी जाधव, सुमैय्या मुलाणी, क्षितिजा सावत यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आंतरविभागीय स्पर्धेत प्रवेश मिळविला.

संस्थेचे अध्यक्ष आमदार अरुण लाड, उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, सचिव ॲड. प्रकाश लाड, समन्वय समितीचे सचिव किरण लाड, प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी अभिनंदन केले. क्रीडाशिक्षक प्रा. विश्वास सावंत, शशिकांत साबळे यांनी मार्गदर्शन केले.

3/10/23

## 'क्रांतिअग्रणी'च्या महिला कबड्डी संघाची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड



कुंडल : कबड्डी स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवून पारितोषिक स्विकारताना क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाचा संघ.

वार्ताहर
कुंडल

येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या महिला कबड्डी संघाची आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत विभागीय कबड्डी स्पर्धेमध्ये संघाने तृतीय क्रमांक मिळविला. संस्थेचे अध्यक्ष आ.अरुण लाड, उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, सचिव ॲड प्रकाश लाड, समन्वय समितीचे सचिव किरण लाड, प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल यांनी अभिनंदन केले. प्रा. विश्वास सावंत, शशिकांत साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

October- 2023

केसरी 1/10/23

## क्रांतिअग्रणी कॉलेजमध्ये एन.सी.सी. युनिट सुरु

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल :** येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) चे स्वयंअर्थसहायित युनिट सुरु होत असल्याची माहिती प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल यांनी दिली. यावेळी एन.सी.सी.चे प्रभारी आफिसर डॉ. सुभाष चवरे उपस्थित होते. महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, सायन्ससह बी.सी.ए. हे पदवीपर्यंतचे विभाग असून महाविद्यालयाने रौप्यमहोत्सवी वर्षात नॅककडून B++ हे मानांकन मिळाले आहे. युनिट मंजुरीसाठी आमदार अरुण लाड व समन्वय समितीचे सचिव किरण लाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल यांनी प्रयत्न केले याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. डुबल यांनी केले आहे.

## क्रांतिअग्रणी महाविद्यालयामध्ये एन.सी.सी. युनिट सुरु

**कुंडल :** येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय छात्र सेनाचे (एन.सी.सी.) स्वयंअर्थसहायित



युनिट सुरु होत असल्याची माहिती प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. यावेळी एन.सी.सी.चे प्रभारी ऑफिसर प्रा. डॉ. सुभाष चवरे उपस्थित होते. महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, सायन्स सह बी.सी.ए. हे पदवीपर्यंतचे विभाग असून महाविद्यालयाने रौप्यमहोत्सवी वर्षात नॅककडून बी.प्लस.प्लस. हे मानांकन मिळाले आहे. सदर युनिट मंजुरीसाठी आमदार अरुण लाड व समन्वय समितीचे सचिव किरण लाड यांचे मार्गदर्शनाखाली प्राचार्य मेजर डॉ. आर.एस. डुबल यांनी विशेष प्रयत्न केले आहे. याचा लाभ परिसरातील विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. डुबल यांनी केले आहे.



कुंडल : आंतरविभागिय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झालेला क्रांतिअग्रणी डा.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाचा संघ.

दै. केसरी 2/10/23.

## क्रांतिअग्रणीच्या महिला कबड्डी संघाची आंतरविभागिय कबड्डी स्पर्धेसाठी निवड

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल :** येथील क्रांतिअग्रणी डा.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या महिला कबड्डी संघाची आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. इस्लामपूर येथील कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालयामध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत सांगली विभागिय कबड्डी (महिला) स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला असून आंतरविभागिय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या संघातील वृषाली कुंभार (संघनायक), गायत्री लोहार, ऋतुजा माळी, प्रगती पाटील, ऋतुजा लाड, सानिका माळी, आरती परबत, श्रुतिका भोकरे, पायल जाधव, सुहानी जाधव, सुमैय्या मुलाणी, क्षितिजा सावत या विद्यार्थीनींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष आ. अरुण(आण्णा) लाड, उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, सचिव ॲड. प्रकाश लाड, समन्वय समितीचे सचिव किरण लाड, प्राचार्य मेजर डॉ. आर.एस. डुबल यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना प्रा. विश्वास सावंत, शशिकांत साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ 2/10/23

## लाड महाविद्यालयात एनसीसी युनिट

**कुंडल :** येथील जी. डी. बापू लाड महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय छात्र सेनेचे (एनसीसी) स्वयंअर्थसहायित युनिट सुरू होत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी दिली. एनसीसी प्रभारी ऑफिसर प्रा.डॉ. सुभाष चवरे उपस्थित होते. युनिट मंजुरीसाठी आमदार अरुण लाड व समन्वय समिती सचिव किरण लाड, प्राचार्य डॉ. आर. एस डुबल यांनी विशेष प्रयत्न केले.